# जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

**खनिकर्म शाखा**

**स्वराज भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर**

**Email id- kolhapur.dmo@gmail.com**


क्र.कार्या/६अ/आरआर/ ९६०८ /२०१५                                                  दिनांक :- २०/८/२०१५

प्रति,

श्री. जुगाई मिनरल्स मु. घुंगूर पो. बांदीवडे
ता. शाहूवाडी जि.कोल्हापूर

विषय :- लॅटेराईट या गौणखनिज खनिजाचा खाणपट्टा मंजूरीबाबत.

संदर्भ :- १. आपला दिनांक २१/३/२०१५ रोजीचा अर्ज व दिनांक १७/७/२०१५ रोजीचा फेर अर्ज.
२. उपवनसंरक्षक, वन विभाग, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/१९०/२०१४.१५ दिनांक १६/४/२०१५
३. संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपुर यांचेकडील पत्र क्र एमएलआर/१८७७/ २०१२/१९६० दि. ६/७/२०१५
४. या कार्यालयाकडील पत्र क्र.कार्या/६अ/आरआर/१७०८/२०१५ दिनांक २०/८/२०१५

आपण मौजे घुंगुर ता.शाहुवाडी येथील वन जमीन ग.नं. ६८५ मधील एकुण क्षेत्र हे ३०८.४७ आर या क्षेत्रापैकी हे. २५.०० आर क्षेत्र, मौजे परळी ता.शाहुवाडी येथील जमीन ग.नं. २२३ मधील एकुण क्षेत्र हे. २६२.४२ आर या क्षेत्रापैकी हे २०.०० आर क्षेत्र, मौजे परखंदळे ता. शाहूवाडी येथील वन जमीन ग.नं ५७२ ते ५७५ मधील एकुण क्षेत्र हे. ११९.७८ आर या क्षेत्रापैकी हे. २५.०० आर व मौजे आंबर्डे ता.शाहुवाडी येथील वन जमीन ग.नं. ९२१ मधील एकुण क्षेत्र हे. ८९.६१ आर या क्षेत्रापैकी हे. २०.०० आर असे एकुण हे. ९०.०० आर क्षेत्र लॅटेराईट या गौण खनिजाचे खाणपट्टा मंजुरीबाबत मागणी अर्ज संदर्भ क्र. १ अन्वये सादर केला आहे.

अर्जित क्षेत्र हे वन विभागाचे असल्याने वन (संवर्धन) अधिनियमन १९८० अंतर्गत वनक्षेत्राचा वापर वनेत्तर कामासाठी करणेचा झाल्यास त्याकरिता केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्रस्ताव सादर करुन केंद्रशासनाची पुर्व मंजुरी प्राप्त झाल्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे सदर अर्जाची छाननी केली असता खाणपट्टा मंजूर करणेकरीता खालील बाबीची /कागदपत्राची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. या कार्यालयाकडील संदर्भ क्र. ४ च्या पत्राचे अवलोकन करावे. त्यानुसार अर्जित क्षेत्र हे वन विभागाकडील असल्याने वन विभागामार्फत जागा निश्चिती व वन विभागाकडील प्रचलित नियमानुसार केंद्र शासनाकडील आवश्यक पुर्वानुमती घेणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकसन व विनियमन) नियम २०१३ च्या कलम ११ (५) (घ) नुसार
   (अ) अर्जित क्षेत्राकरीता मान्य केलेला खाणकाम आराखडा आणि क्रमवधी खाण समाप्ती योजना आवश्यक आहे.
   (ब) कलम ११ (५) (च) पर्यावरणविषयक अनुमती आवश्यक आहे.

तेव्हा आपणास सुचित करणेत येते की उपरोक्त नमुद केलेल्या १ व २ बाबींची पुर्तता करावी त्यानंतरच अंतिम खाणपट्टा मंजूर करणेची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या                                                  अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर

Annexure 2A

# जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

## खनिकर्म शाखा

स्वराज भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर

Email id- kolhapur.dmo@gmail.com

क्र.कार्या/६अ/आरआर/ २३८/२०१६ दिनांक :-२५/ ०१ /२०१६

प्रति,

श्री. जुगाई मिनरल्स मु. घूंगूर पो. बांदीवडे
ता. शाहूवाडी जि.कोल्हापुर

विषय :- मौजे घुंगूर येथील गट नं. ६८५ मधील २५ हे.४० आर क्षेत्र व मौजे आंबर्डे येथील गट नं. ९२१ मधील ९ हे.२० आर क्षेत्र व मौजे परळी येथील गट नं. २२३ मधील ५ हे.४० आर क्षेत्र असे एकूण ४० हे. ०० आर क्षेत्र लॅटेराइट गौणखनिजाचे खाणपट्टा मंजूरी प्रस्तावाबाबत.

संदर्भ :- १. विषयांकीत प्रकरणी आपला दिनांक १७/३/२०१५ रोजीचा खाणपट्टा अर्ज.
२. SEAC -१ यांचेकडील ११९ बैठक दिनांक १५ व १६ जानेवारी २०१५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सदंर्भ क्र. १ अन्वये मौजे घुंगूर व मौजे आंबर्डे व मौजे परळी येथील एकूण ४० हे. ०० आर क्षेत्रावर खाणपट्टा मिळणेकरीता अर्ज सादर केला असून त्या अनुषंगाने पर्यावरण अनुमती मिळणेकरीता तसा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावावर संदर्भ क्र. २ च्या बैठकीत चर्चा झाली असता प्रचलित नियमानुसार अर्जित क्षेत्र हे सलग असणे आवश्यक आहे. तथापि मौजे परळी येथील गट . २२३ मधील ५ हे. ४० आर क्षेत्र हे आंबर्डे गट नं. ९२१ या क्षेत्रासोबत चिंचोळया (अरुंद) भूभागाने संलग्न असून त्यामुळे भूवैज्ञानियदष्टया सदर अरुंद क्षेत्रात खाणकाम करणे शक्य नसल्याने सदर भाग वगळून तसे नव्याने प्रस्ताव सादर करणेचे बैठकीत सुचित करणेत आले.

तेव्हा याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, मौजे घूंगूर, मौजे आंबर्डे व मौजे परळी या क्षेत्रावरील उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दुरुस्त प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह (उदा. दुरुस्त अर्ज, खाणकाम आराखडा, पर्यावरण अनुमती इ.) या कार्यालयास सादर करावेत, जेणेकरुन यासंबंधी पुढील निर्णय घेणे शक्य होईल.

जिल्हा खनिकर्म अधिकारी
कोल्हापूर